महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३२२ वा | दिनांक : ०४/११/२०२५ | वार : मंगळवार

## चारित्र्यहनन करणाऱ्या रुपाली चाकणकर अजूनही पदावर कशा? प्रकाश महाजनांचा सवाल



**बीड :** फलटण महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी विरोधकांनी सरकारला चांगलेच घेरले आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या सुषमा अंधारे यांनी थेट फलटण पोलिस स्टेशनसमोर ठिय्या आंदोलन केले होते. आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी देखील राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर टीका केली आहे. मृत डॉक्टरचे चारित्र्यहनन करणाऱ्या रुपाली चाकणकर अजूनही पदावर कशा? अजित पवार अशा कोणत्या रूपात अडकले आहेत? असा सवाल महाजन यांनी विचारला आहे.

फलटण प्रकरणी रुपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेत मृत महिला डॉक्टरचे चॅट समोर आणले होते. यावरून प्रकाश महाजन यांनी टीका केली आहे. ते म्हणाले, रुपाली चाकणकर यांनी त्या मृत महिलेचे चारित्र्यहनन केले आहे. ती डॉक्टर बीड जिल्ह्यातील असल्याने आमचे भावनात्मक नाते आहे. एवढे होऊनही रुपाली चाकणकर महिला आयोगाच्या अध्यक्षपदी कशा? अजित पवार कोणत्या रूपात अडकले आहेत? असा सवाल महाजन यांनी उपस्थित केला.

मंत्री जयकुमार गोरे यांनी देखील मृत महिलेच्या चारित्र्यावर बोट ठेवले होते. यावर प्रकाश महाजन म्हणाले, जयकुमार गोरे यांनीही मृत महिलेच्या चॅटिंगवर भाष्य करत तिचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला. जयकुमार गोरे यांचे लोकांनी काय काय दाखवले नाही? ज्या महिलेला एक कोटी रुपये देताना ट्रॅप करण्यात आले ते एक कोटी गोरेंकडे कसे आले हे ईडीने त्यांना विचारले. त्यांच्या दृष्टीने स्त्री जर फक्त उपभोगाची वस्तू असेल तर त्यांच्या तोंडून हे वक्तव्य येणार. हे कोणीही मुळ भाजपचे नाहीत, ते बाहेरून आले आहेत, त्यांनी बाहेरून येताना हा रोग आणला, अशी खोचक टीका महाजन यांनी केली आहे. तसेच राज्याचा एक मंत्री असे कसे काय बोलू शकतो? समजा त्या महिलेची चॅटिंग असेल तर तुम्ही काय तिला आत्महत्या करायला लावणार का? असा संतप्त सवालही महाजन यांनी उपस्थित केला आहे.

प्रकाश महाजन यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या वारसदार कोण यावर बोलणारे पाशा पटेल यांच्यावर जोरदार टीका केली आहे. महाजन यांनी पाशा पटेल यांना 'उपटसुंभ' संबोधत, त्यांच्यावर मतलबी आणि संधीसाधू असल्याचा आरोप केला. गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर, जेव्हा पार्थिव परळीत आणले गेले, तेव्हा धनंजय मुंडे यांनी अंत्यसंस्कार करावेत असे म्हणणारा पाशा पटेलच होता, अशी आठवण महाजन यांनी करून दिली. त्यांनी प्रश्न विचारला की, गोपीनाथ मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्याबद्दल धनंजय मुंडे यांनी केलेले वक्तव्य पाशा पटेल यांना माहिती नाही का? त्यामुळे धनंजय मुंडे हे मुंडे साहेबांचे वारसदार होऊ शकत नाहीत. प्रकाश महाजन यांनी ठामपणे सांगितले की, गोपीनाथ मुंडे यांचा वारसदार ठरवण्याचा हक्क त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या ओबीसी वर्गाला आहे आणि त्यांचा खरा वारसा फक्त पंकजा मुंडेच आहेत, दुसरे कोणी नाही.

## दोन कोटींची लाच मागणारा पोलीस उपनिरीक्षक अटकेत



**पुणे :** तब्बल दोन कोटी रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेला पोलिस उपनिरीक्षक प्रमोद चिंतामणी याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली आहे. लाचेच्या मागणीतील 46 लाख 50 हजार रुपये स्वीकारताना सापळा रचून एसीबीच्या पथकाने ही कारवाई केली असून, आरोपीला 6 नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे व्यवसायाने वकील असून त्यांच्या आशिलाविरुद्ध बावधन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्या गुन्ह्यात आशिलाच्या वडिलांना अटक झाली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. या गुन्ह्याचा तपास पीएसआय प्रमोद चिंतामणीकडे होता. तक्रारदाराच्या आशिलाला मदत करण्यासाठी आणि अटकेत असलेल्या वडिलांच्या जामीन प्रक्रियेत सहकार्य करण्याच्या मोबदल्यात उपनिरीक्षक चिंतामणी याने दोन कोटी रुपयांची लाच मागितली होती.

तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार केल्यानंतर करण्यात आलेल्या पडताळणीत, आरोपी उपनिरीक्षकाने दोन कोटींपैकी एक कोटी रुपये स्वत:साठी आणि उर्वरित एक कोटी रुपये वरिष्ठांसाठी मागितल्याचे उघड झाले. त्यानंतर तक्रारदाराने पहिला हप्ता म्हणून 50 लाख रुपये देण्याचे ठरवले.

लाचलुचपत विभागाने सापळा रचून पीएसआय प्रमोद चिंतामणी याला तक्रारदाराकडून 46 लाख 50 हजार रुपये (यात 1.5 लाख रुपये खऱ्या आणि 45 लाख रुपयांच्या खेळण्यातील नोटांचा समावेश होता) घेताना रंगेहात पकडले. त्याच्याकडून लाचेची रक्कम, दोन मोबाईल फोन आणि रोख रक्कम मिळून एकूण 46.53 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या सखोल तपासासाठी आरोपीने केलेल्या दाव्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांचा यात सहभाग आहे का, याचा तपास पोलिस कोठडीदरम्यान करण्यात येणार आहे.




## रुपाली चाकणकर आणि एसपी तुषार दोषींनी तिचे चारित्र्यहनन केले - सुषमा अंधारे



**सातारा :** सातारा जिल्ह्यातील फलटणच्या उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरच्या आत्महत्येनंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी याप्रकरणी आक्रमक पवित्रा घेतला आहे. मृत महिलेला न्याय मिळवून देण्यापेक्षा रुपाली चाकणकर आणि पोलिस अधीक्षक तुषार दोषींनी तिचे चारित्र्यहनन केले, असा आरोप अंधारे यांनी केला आहे. तसेच जयकुमार गोरे हे त्या महिलेचे चारित्र्य ठरवणार का? त्या आधी गोरे यांनी स्वत:च्या चारित्र्याकडे बघावे, असा टोलाही सुषमा अंधारे यांनी लगावला आहे.

मृत महिलेला न्याय मिळवून देण्यासाठी सुषमा अंधारे यांनी फलटण पोलिस स्टेशनवर मोर्चा काढला. यावेळी एसपी तुषार दोषी भेटले नसल्याने सुषमा अंधारे आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. त्यानंतर त्यांनी पोलिस स्टेशनसमोरच ठिय्या मांडला. त्यानंतर डीवायएसपी खांबे यांनी सुषमा अंधारे यांच्याशी चर्चा केली. यावेळी अंधारे यांनी अनेक मुद्यांवरून पोलिसांच्या तपास पद्धतीवर टीका केली.

सुषमा अंधारे यांनी माहिती तपासासंदर्भात माहिती मागितली. परंतु, ही माहिती अशी उघड करता येणार नसल्याचे पोलिसांनी सांगितले. यावरून अंधारे यांनी पोलिस अधीक्षक तुषार दोषी यांचे अक्षरशः वाभाडेच काढले. त्या म्हणाल्या, जर ही माहिती जाहीर करता येत नाही असे असेल तर रुपाली चाकणकर यांनी त्या महिलेचे चॅट कसे जाहीर केले? त्यावेळी त्यांच्या बाजूला बसलेल्या तुषार दोषींनी त्यांना का आडवले नाही? तुषार दोषी हे नावाप्रमाणे वागले आणि त्यांनी मृत डॉक्टरचे ठरवून चारित्र्यहनन केले का? असा खरमरीत सवाल अंधारे यांनी उपस्थित केला.

फलटण पोलिस ठाणे छळछावणी झाली आहे. माझा आक्षेप पोलिस अधीक्षक तुषार दोषी यांच्यावर असल्याचे सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे. अश्विनी बिद्रे प्रकरणात त्यांनी जे केले ते अंतरवाली सराटीमध्ये सुद्धा केले. त्यामुळे त्यांच्या तपासावर आमचा विश्वास नाही, असे अंधारे यांनी स्पष्ट केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ नोव्हेंबर २०२५


# पाण्याचा प्रवाह अचानक वाढला मायलेकीचा वाहुन गेल्यामुळे मृत्यु



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जळकोट तालुक्यात अतिशय दुर्दैवी घटना घडली असून, तिरू नदीमधील पाण्याच्या प्रवाहामध्ये वाहून गेल्यामुळे मायलेकीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३ नोव्हेंबर रोजी सकाळी अकराच्या दरम्यान घडली आहे .याबाबत अधिक माहिती अशी की , जळकोट तालुक्यातील मर सांगवी येथील कौशल्या अजय वाघमारे वय ३५ व रुक्मिणी अजय वाघमारे वय १४ या दोघी मायलेकी मरसांगवी येथीलच मरीबा वाघमारे यांच्या शेतामधील कापूस वेचण्यासाठी मजुरीने जात होत्या . कापूस वेचण्यासाठी चे शेत नदीपलीकडे होते . शेताकडे जात असताना नदी मध्ये पाणी कमीच होते . मात्र तिरू नदीमधील पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्यामुळे या दोघीही पाण्याच्या प्रवाहामध्ये वाहून गेल्या व दुर्दैवी या दोघींचाही मृत्यू झाला .सदरील मायलेकी वाहून गेल्याची माहिती मिळताच गावातील काही जन नदीपात्रात धावले व मायलेकीला काढण्याचा प्रयत्न केला परंतु तोपर्यंत दुर्दैवी मृत्यू झाला होता . मायलेकीचा एकाच वेळी दुर्दैव मृत्यू झाल्यामुळे गावावर शोककळा पसरली आहे .तिरू प्रकल्पामधून पाणी सोडल्यामुळे प्रवाह वाढलामरसांगवी गावाच्या वरच्या बाजूकडून तिरू प्रकल्प आहे . हा तिरू प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरलेला आहे . दररोज या तिरू प्रकल्पाचे गेट उघडून पाणी नदीपत्रात सोडले जात आहे . अचानक तिरू नदीपत्रातून पाणी सोडण्यात आले . व मरसांगवी येथे पाण्याचा प्रवाह अचानक वाढला, तसेच पाण्याचा वेग देखील वाढला . यामुळे पाण्याचा अंदाज न आल्याने या दोघीही मायलेकीच्या मृत्यू झाला असल्याची माहिती येथील सरपंच रवी गोरखे व चेअरमन उमाकांत इमडे यांनी दिली .अनेक दिवसापासून होत आहे पुलाची मागणीमर सांगवी हे गाव तिरू नदी काठावर आहे तसेच तिरुनिदीला महापूर आल्यानंतर या गावांमध्ये देखील महापुराचे पाणी शिरते . अनेक वेळा गावातील नागरिकांना माळावर जाऊन बसावे लागले होते . या गावातील नागरिकांना नदीच्या पात्राच्या पलीकडे असलेल्या शेताकडे जाण्यासाठी मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतो . आता यावर्षी तर सतत नदीपात्रातून पाणी वाहत आहे यामुळे शेतक-यांची शेताकडे जाणे बंदच झाले आहे . अनेक वेळा नदीपात्रातून पुढे शेताकडे जाण्यासाठी जो मार्ग आहे त्या ठिकाणी पुल उभा करावा अशी मागणी गावक-यांनी केली होती . अनेक राजकीय तसेच विविध अधिका-यांनी या गावाला भेटी देऊन या ठिकाणाची पाहणी केली होती . यावेळी गावक-यांनी पूल उभा करावा अशी मागणी केली होती . परंतु पूल उभा करण्यात आला नाही . जर या ठिकाणी पूल असता तर या दोघींचा जीव वाचला असता अशी देखील चर्चा सध्या गावात सुरू आहे .पुरामुळे दोन महिन्यात सहा जणांचा मृत्यूजळकोट तालुक्यात या वर्षी अतिवृष्टीने कहर केला . यामुळे अनेक नद्यांना पुर आला . तालुक्यात या दोन ते तिन महिन्यात पुरामध्ये वाहून गेल्याने सहा जणांचा मृत्यू झाला आहे . यास कमी उंचीचे पुल तसेच पुल नसणे हे प्रमुख कारण आहे . या पुरामुळे माळहिप्परगा येथील शान सुर्यवंशी व वैभव गायकवाड दोघेजण वाहून गेले होते तसेच तिरुका येथील सुदर्शन घोनशेट्टे हा वाहून गेला होता व या तिघांचा पुरात वाहून गेल्यामुळे मृत्यू झाला . तसेच तालुक्यातील ढोरसांगवी येथील बालाजी पोतने हे शेतकरी पुराच्या पाण्यात वाहून गेले होते . तर आता मरसांगवी येथील दोघी माय लेकीचा मृत्यू झाला आहे .






## अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय कबड्डी संघासाठी निवड



**दौलताबाद (जावेद अहमद) :** अंजना स्कूल ऑफ एक्सलन्सच्या दोन विद्यार्थ्यांनी आपल्या खेळ कौशल्याच्या जोरावर राज्यस्तरावर आपले स्थान निश्चित केले आहे. अर्जुन गोलाईत आणि संभव बनकर यांची निवड ३६ वी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आयोजित किशोर गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा या स्पर्धेसाठी झाली आहे. या दोन्ही खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळ, कौशल्य, ताकद आणि संघभावनेच्या जोरावर ही निवड मिळवली असून ते आता नंदुरबार जिल्ह्यात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घेणार आहेत.त्याच्या या यशाबद्दल त्याचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष शंकर पल्हाळ, अध्यक्षा स्मिता पल्हाळ, उपाध्यक्षा मोनिका पल्हाळ, संचालक स्वर्णजित पल्हाळ, मुख्याध्यापक स्नेहा पवार,क्रिडा शिक्षक आकाश इंगळे, व्यवस्थापक देव साठे व सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले आहे.

## "मातीच्या अश्रूंची कहाणी"

भिजला मका, भिजला कापूस, वाती झाल्या ओल्या,
कष्टाची फळं गळून गेली, डोळ्यांत वेदना खोल्या।

आभाळाचं दान नको रे, हे अश्रूंचं देणं,
धरतीमातेच्या कुशीत आता, फक्त दु:खाचं माळ बांधणं।

हमीभावानं कंबर तुटली, शेती झाली खंगली,
सत्ता सांगते दिलं सगळं, पण रिकामी हात पांगली।

शासनाच्या आदेशातून, येतं फक्त दिलासं,
प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्याला, मिळे ना एक धान्य घास।

मातीची माया वाहून गेली, ओलसर झाली स्वप्नं,
पावसाच्या तडाख्याने विझली, आशेची शेवटची कणं।

सोयाबीनच्या शेतात आता, चिखलाचे डोंगर,
वेली सडल्या, मुळे कुजली, स्वप्नं झाली भंगर।

जमिनी खरडून गेल्या, ओसाड झाल्या वस्ती,
हिवाळ्यातला हा पाऊस, वाढवितो नव्या व्यथी।

मुलाचं शिक्षण अडकलं, फीचा राहिला भार,
मुलीच्या लग्नाचं देणं, आता झालं स्वप्न उधार।

कर्जाचा डोंगर वाढतो, मनावरती छाया,
देवा आता धरती वाचव, शेतकऱ्याला दया।

पिकात जीव, शेतात उमेद, हृदयात आहे आशा,
सोनं नको, दे मातीचं सुख, एवढीच विनंती देवा।

**//काव्य रचना//**
**संदिप नानासाहेब वाकडे**
**रा.खेडा ता.कन्नड**
9766992776

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ नोव्हेंबर २०२५


## कन्नड तालुक्यातून नवनविन साहित्यिक घडावेत - अॅड. कृष्णा पा. जाधव



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुका हा निसर्ग व ऐतिहासिक , सामाजिक आणि समृद्ध साहित्यिक परंपरा लाभलेला तालुका आहे. कन्नड तालुक्यात तिफणच्या माध्यमातून साहित्य चळवळ वृद्धिंगत होत असून या उपक्रमातून प्रेरणा घेवून अनेक नवोदित लेखक - कविना प्रेरणा व मार्गदर्शन मिळत आहे. यापुढेही या चळवळीतून उत्तमोत्तम नवोदित लेखक - कवी घडावेत असे प्रतिप्रादन सामाजिक कार्यकर्ते अॅड. कृष्णा पा. जाधव यांनी केले. (ता. २ ) ते पिशोर येथे त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड, अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था पुणे शाखा कन्नड आयोजित तिफण साहित्य संवाद उपक्रमांतर्गत कन्नड तालुक्यातील लेखक - वाचक - पत्रकार स्नेहमेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक व अध्यक्ष म्हणून ते उपस्थित होते. व्यासपीठावर तिफणकार डॉ. शिवाजी हुसे, डॉ. संजय गायकवाड, नाना लहाने, युवा नेते गणेशराव घुगे, लक्ष्मण वाल्डे, यांची उपस्थिती होती. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवर व साहित्यिक, पत्रकार, वाचक यांचे स्वागत शॉल व पुस्पहार देऊन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. त्यांनी कन्नड तालुक्यातील साहित्य परंपरा व आगामी वाटचाल , विविध उपक्रम यावर प्रकाश टाकून भूमिका विशद केली, ज्ञानेश्वर गायके यांच्या माझ्या कन्नडच्या भूमित या कविता वाचनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. गणेश घुगे , यांनीही मनोगत व्यक्त केले. पहिल्या सत्रात युवा लेखक लक्ष्मण वाल्डे यांच्या बाळ्या सायकल अम्बुलन्सवाला या कादंबरीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. लक्ष्मण वाल्डे यांनी कादंबरी लेखनाची भूमिका व कादंबरीची निर्मिती प्रक्रिया उलगडून दाखविली. तिफण वाचक चळवळीमुळे मला लेखनास प्रेरणा मिळाल्याचे सांगून ही कादंबरी प्रेरणा देणारी आहे असे मत व्यक्त केले. नाना लहाने कादंबरीवर भाष्य करतांना म्हणाले की, लक्ष्मण वाल्डे यांची कादंबरी ही शुन्यातून विश्व निर्माण करणाऱ्या एका सामान्य माणसांची असामान्य कहाणी आहे. लेखकाने स्थानिक बोली भाषा, विविध घटना प्रसंग आणि वास्तवाचे भान ठेवून या कादंबरीचे लेखन केले आहे. डॉ. संजय गायकवाड यांनीही कादंबरीवर भाष्य केले ते म्हणाले की, पिशोर परिसरातील समाज जीवनाचे चित्रण करणारी ही कादंबरी सामान्य माणसांच्या जिद्दीची व संघर्षाची कर्तृत्वाची गाथा आहे. लक्ष्मण वाल्डे यांनी या कादंबरीसाठी केलेले प्रयत्न व मेहनत या बद्दल त्यांचे अभिनंदन केले. नायब तहसिलदार दिलीप कुमार सोनवणे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रविण दाभाडे यांनी सूत्रसंचलन करून आभार मानले. वन भोजनानंतर विविध विषयावर चर्चा, भेटीगाठी, परिचय कार्यक्रम संपन्न झाला. आगामी उपक्रमावर चर्चा झाली, त्यानंतर गाणी, कविता आणि गप्पाची सुरेख मैफल रंगली, यावेळी पुजा चव्हाण, रामेश्वर मोरे, इब्राहिम पठाण, निवृत्ती काळे, ज्ञानेश्वर गायके, दत्ता मोरस्कर, प्रा. अशोक दुधकर, जगन्नाथ जाधव, समृद्धी मोतिंगे, मथुरा काकडे, आदींनी कविताावाचन केले. या कार्यक्रमास कन्नड तालुक्यातील लेखक, वाचक, पत्रकार, शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी संयोजन समितीचे अरुण थोरात, संदीप ढाकणे, संदीप वाकडे, श्रीराम दापके, ज्ञानेश्वर गायके, सुरेश औटे, आदींनी परिश्रम घेतले. संदीप वाकडे यांनी सूत्रसंचलन केले. आभार अरुण थोरात यांनी मानले.

## पिशोर येथे बाळ्या सायकल ॲम्बुलन्सवाला या मराठी ग्रामीण कादंबरीचे प्रकाशन संपन्न



**पिशोर :** पिशोर येथे चला जाऊया, कवितेच्या गावा... आयोजित केलेल्या तिफण स्नेह मेळावा आयोजक अॅड. कृष्णा काका पाटील जाधव कादंबरीवर भाष्य नाना लहाने यांनी कादंबरीला पूर्ण न्याय देत आपली जबाबदारी पार पाडली.या आधी १५ नोव्हेंबर २०२३ ला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदानातून बहुरंगी काव्यसंग्रह प्रकाशित. शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या अयशस्वी माणसाची यशस्वी कहाणी... फळाची अपेक्षा न करता कर्म करणाऱ्या ध्येयवेढ्या माणसाची ही कहाणी... स्वतःच्या आयुष्याचा मार्ग स्वतः बनवणाऱ्या संघर्षकाराची ही कहाणी... या कादंबरीत ग्रामीण भागाच्या वेदना, ग्रामीण भागात राहणाऱ्या माणसांच्या जीवनाचा खडतर प्रवास मांडलेल्या आहे... ही कादंबरी पिशोर व पिशोर परिसरावर आधारित आहे . याच ग्रामीण कादंबरीचे पिशोर येथे बाळ्या सायकल ॲम्बुलन्सवाला या मराठी ग्रामीण कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. त्या वेळी उपस्थित त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड, अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था पुणे शाखा कन्नड चे तिफणकार डॉ. प्रा. शिवाजी हुसे, नायब तहसीलदार दिलीप कुमार सोनवणे, डॉ.प्रा.संजय गायकवाड,युवा नेते गणेश घुगे,रंगनाथ लहाने आदीच्या हस्ते कादंबरीचे प्रकाशन झाले. प्रवीण दाभाडे , ज्ञानेश्वर गायके, संदीप वाकडे, श्रीराम दापके, अनिल भडगे, डॉ. प्रा. केशरचंद राठोड ,संदीप ढाकणे, दत्ता मोरस्कर,भगवान लहाने , प्रकाश शहरवाले,अरुण थोरात, जगन्नाथ जाधव, अशोक दुधकर , सुरेश औटे, निवृत्ती काळे, आदीनी पुढील साहित्यिक वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या.

## पत्रकार सिद्राम देशमुख यांना पितृशोक



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयातील कार्यालयीन अधीक्षक श्री.सिद्राम देशमुख यांचे वडील विश्वनाथ धुळप्पा देशमुख यांचे नुकतेच दु:खद निधन झाले.श्री. विश्वनाथ देशमुख हे परिसरातील सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अग्रगण्य नाव. जाती धर्माच्या पलीकडे जाऊन गरीब श्रीमंतीचा कसलाही भेदभाव न करता सर्वांच्या सुखदु:खात सहभागी होणारे एक अनोखे व्यक्तिमत्व होते. सर्वांच्या सहवेदनेत सहभागी होऊन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची त्यांची कसोटी होती. गुंजोटी पंचक्रोशीतील एक बुलंद आवाज म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जायचे. नुकतेच अल्पशा आजाराने त्यांचे देहावसान झाले.एक हक्काचा आधारवड गेला.आपुलकीचा,मायेचा पाझर हरवला. त्यामुळे परिसरात सर्व स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पाठीमागे पत्नी,मुल, नातवंड असा परिवार आहे.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ नोव्हेंबर २०२५


# दिवाळी अंक वाचनाचा आनंद अवर्णनीय- प्रशांत गौतम





**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** दिवाळी अंक केवळ मनोरंजनच करीत नसून ते विविध विषयांचे, पैलूंचे ज्ञान देणारे साहित्य असून त्यांच्या वाचनाचा आनंद हा अवर्णनीय असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ बालसाहित्यिक प्रशांत गौतम यांनी केले.शहरातील समर्थनगर मधील शासकीय विभागीय ग्रंथालयात दिवाळी अंक प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .सदर कार्यक्रम प्रसंगी श्री गौतम हे अध्यक्ष म्हणून बोलत होते.सदर दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसिद्ध हास्यकवी प्राध्यापक विष्णू सुरासे यांचे हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, ज्येष्ठ पत्रकार सुधीर सेवेकर, अण्णा वैद्य, जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाहक गुलाबराव मगर, पी.यू. जैन शाळेचे मुख्याध्यापक विजय पाटोदी हे उपस्थित होते.उद्घाटक प्रा. सुरासे यांनी दिवाळी अंकांचे व वाचनाचे महत्त्व विषद करून वाचन मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनणे गरजेचे असल्याचे सांगून त्यांनी याप्रसंगी हलक्या फुलक्या विनोदाने कार्यक्रमास रंगत आणली. विविध विषयांवरील दिवाळी अंक रुपी फराळाचा वाचकांनी लाभ घेण्याचे आवाहन सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी केले. नागरिकांनी दिवाळी निमित्त करत असलेल्या खरेदी बरोबरच दिवाळी अंक देखील खरेदी करण्याचे आवाहन जेष्ठ पत्रकार सुधीर सेवेकर यांनी केले.सदर कार्यक्रमास शासकीय विभागीय ग्रंथालयाचे वाचक, सभासद तसेच शहरातील पी.यु.जैन शाळेचे शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथालय निरीक्षक आवजी गलांडे यांनी केले. सदर दिवाळी अंकांचे प्रदर्शन दिनांक 10 नोव्हेंबर पर्यंत कार्यालयीन वेळेत सर्वांसाठी खुले असून वाचनप्रेमी नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले आहे.

## धुक्याच्या कुशीत..

धुक्याच्या कुशीत दडलंय गाव
रामप्रहरी त्याच्या मनी गोड भाव

पानावर मोती किरणे कोवळी
मातीत या काळ्या पसरे निळाई

शेतशिवारात हरवला रानवारा
झोपेतून जागी झाली वसुंधरा

दवबिंदूत न्हाली हिरवी वनराई
सजली मोत्याने सारी डोंगराई

उजाडला दिस गाव हा जागला
मंदिरात घंटानाद निनादला

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
**मो. 94033 84889**


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

DMLT — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी / १२ वी पास
SANITARY HEALTH INSPECATOR — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी / १२ वी पास
PG RADIOLOGY — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : Any B.Sc.
C.T.SCAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास
E.C.G. — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास
PGDMLT — कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc (Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY — कालावधी १ वर्ष, पात्रता : १०वी, १२ वी पास
रेडिओलॉजी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री — कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास
DIALYSIS TECHNICIAN — कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी / १२ वी पास
O.T.TECHINICIAN — कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी १२ वी पास



ADMISSION OPEN

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ नोव्हेंबर २०२५

# ‘शहाण्या माणसांचा क्लास’



“अरे, पण गरज काय आहे याची?” हे वाक्य ज्यांना योग्यवेळी, योग्य ठिकाणी, योग्य गोष्टीविषयी आणि योग्य व्यक्तीशी बोलताना वापरता येतं ना, ती माणसं शहाणी असतात. जपून वागतात, जपून जगतात आणि जगताना इतरांनाही जपतात.ऊठसूठ हॉलात जाऊन खाणार नाहीत, सतत बाहेरून पार्सल मागवणार नाहीत, सारखी खरेदीही करणार नाहीत. रेल्वे स्टेशन किंवा एसटी स्टॅन्डवर पहाटे साडेचार किंवा पाच वाजता एकटे उतरले तर अर्धा तास तिथंच थांबतील. भल्या पहाटे जाऊन घरच्यांच्या साखरझोपेचा विचका करणार नाहीत आणि दुप्पट-तिप्पट पैसेही खर्च करणार नाहीत. अर्धा तास थांबतील, बसेस सुरू झाल्या की शांतपणे घरी पोचतील. सकाळचा पहिला चहा घरीच घेतील, सात वाजता आलेला वर्तमानपत्राचा ताजा अंक वाचतील. अर्धा तास वाचवण्यासाठी जिवाचा आटापिटा करून तिप्पट पैसे खर्च करणार नाहीत. पण कुटुंब असेल, लहान बाळ असेल तर असं वागणार नाहीत. रिक्षा करतील, थोडीफार घासाघीस करतील, आणि घरी जातील. हे जगण्यातलं व्यावहारिक शहाणपण पिढ्यानपिढ्या रक्तात मुरलेला एक वर्ग आपल्या समाजात आहे. अनेकजण त्यांना मिडलक्लास म्हणतात, पण माझ्या लेखी ती खरी शहाणी माणसं असतात. त्यांना ‘मजेत जगावं कसं?’ हे समजायला पुस्तक वाचावं लागत नाही, ते मजेतच जगत असतात. किंबहुना, जगण्याचा आस्वाद घेण्याची कला त्यांना जन्मजात अवगत झालेली असते. आपलं मूल अनवाणी शाळेत जाणार नाही याची काळजी त्यांना असते. ती काळजी वूडलँड, क्रॉक्स, ली कूपर, बाटा यांनी शांत करण्याचा उद्योग ते करत बसत नाहीत. लखानी किंवा पॅरागॉन ते आनंदानं निवडतात, आनंदानं वापरतात, गरजा पूर्ण करतात आणि मस्त राहतात. स्वत:ची वाहनं ते स्वत: धुतात, पुसतात. सायकलला स्वत:च ऑईलिंग करतात. घरातल्या पंपानं सायकलच्या टायरमध्ये हवा भरतात. सुटी फुलं आणतील, देवाच्या पूजेचे हार स्वत: तयार करतील. बुटांना पॉलिश स्वत:च करतील. ते रोज जमणार नसेल तर बाहेरून आल्यावर बूट काढले की, मोज्यानंच ते बूट स्वच्छ पुसतील, आत ठेवतील आणि मग मोज्यांचा जोड धुवायला टाकतील. हे काटकसरीचं जगणं नसतं, हे योग्य जगणं असतं. ज्या खोलीत कुणी नसेल तिथले लाईट्स आणि पंखे बंद ठेवतात. गरज नसताना घरभर दिवे आणि पंखे विनाकारण चालू ठेवण्याचा शौक त्यांना नसतो. रात्री खिडक्या उघड्या ठेवून झोपतात, एसीची गरज पडत नाही. गरज नसताना ‘बाय वन गेट वन फ्री’ च्या शंभर जाहिराती पाहिल्या तरीही त्यांना काहीही फरक पडत नाही. पण गरज असेल तेव्हा रेमण्ड, सियाराम, अरविंद मिल्स, विमल असंच कापड घेतील. रेडिमेड घेण्यापेक्षा शिवून घेतील. मस्तपैकी चार-पाच वर्षे तरी सहज वापरतील. घरी कुणी आलं की, पोह्याचा चिवडा, भडंग, खोबऱ्याची वडी किंवा शेंगादाण्याचा-रव्याचा-बेसनाचा लाडू मनापासून देतील आणि नंतर आलं घातलेला कपभर चहा.. (हे सगळे पदार्थ घरीच स्वहस्ते केलेले असतात आणि चहापत्ती घाऊक मार्केटमधून आणलेली असली तर आलं, गवतीचहा, चिमूटभर सुंठ घालून तिला फक्कड रंगत कशी आणायची, हे तंत्र बरोब्बर समजलेलं असतं.) आल्यागेल्याचा, पै-पाहुण्यांचा पाहुणचार मस्त करतात, रिटर्न गिफ्ट म्हणून उगाचच महागड्या गोष्टी देऊन इंप्रेशन मारायला जात नाहीत. सणावाराला घरी गोड पदार्थ तर होणारच. घरच्या तुपातला शिरा, खीर, चक्का आणून घरी केलेलं श्रीखंड (अनेकदा चक्कासुद्धा घरीच करतात) हे पदार्थ पेटंट असतात. अचानकच गोड खाण्याची हुक्की आलीच तर केळ्याचं शिकरण दोन मिनिटांत तयार..! घरात कुणी नसेल आणि एकटाच मुलगा किंवा पुरूष जरी असेल तरी स्वत:च्या वेळेपुरती मुगाची खिचडी त्याला करून खाता येते. दुपारच्या उरलेल्या पोळ्यांची वरणफळं त्याला बरोबर जमतात. कालचा उरलेला भात फोडणी देऊन सकाळी खाता येतो. किंवा वेळप्रसंगी दहीपोहे करूनही उदरभरणाची सोय करता येते. त्यासाठी हॉटेलची पायरी चढण्याची गरजच पडत नाही. ह्या जगण्याला लो प्रोफाईल, मिडलक्लास किंवा चिक्कूपणा म्हणणारी माणसं बिनडोक असतात. कारण, हे परफेक्ट आत्मनिर्भर जगणं आहे.यांच्या घरातले पुरूष दळणं आणतात, वाणसामान आणतात, भाजी आणतात, इस्त्रीचे कपडे लॉन्ड्रीत नेऊन देतात आणि घेऊनही येतात. रद्दीवाल्याकडे स्वत:च रद्दी घेऊन जातात. स्वत: पानं घेणं आणि जेवण झाल्यानंतर स्वत:चं ताट स्वत: घासणं, फरशी पुसणं यात त्यांना काहीही गैर वाटत नाही. पहिल्या पगारात घेतलेलं घड्याळ ते रिटायर होईपर्यंत छान वापरतात. पाच-सात वर्षे चष्म्याची फ्रेम बदलत्या नंबरनुसार काचा बदलून वापरतात. याच्यात त्यांना कसलाही कमीपणा वाटत नाही. मुलाचा पहिला वाढदिवस, पाचवा वाढदिवस खाजगी हॉल किंवा पार्टी हॉल घेऊन साजरा-बिजरा करत नाहीत. असल्या कृत्रिम आनंदाची त्यांना गरज नसते. पण मुलांच्या शिक्षणाविषयी मात्र अजिबात तडजोड नसते. अगदी निगुतीनं मुलांना शिकवतात. महागड्या ब्रॅन्डेड गोष्टी चांगल्या असतातच असं नाही, यावर त्यांचा पूर्ण विश्वास असतो. त्यामुळं, चांगली शाळा ते बरोबर निवडतात आणि मुलांना शिक्षण देतात. मुलांना खाऊनही माजू देत नाहीत आणि टाकूनही माजू देत नाहीत. सापशिडीतल्या ९८ आकड्यावरच्या सापाला घाबरायचं नाही, हे आपल्या मुलांना शिकवायला त्यांना कुठल्याही मोटिव्हेशनल ट्रेनरची गरज भासत नाही, ते स्वत:च खंबीर असतात. आवश्यक तेवढी यथाशक्ती बचत करून, साधी सरळ भरवशाची गुंतवणूक आणि साधा जीवनविमा एवढ्यावर त्यांना सुरक्षित वाटतं. गडगंज श्रीमंत होण्याचा हव्यास ते धरत नाहीत. अनैतिक मार्गानं काहीही कमावण्याचा विचारही करत नाहीत. “जोडोनियां धन उत्तम व्यवहारें, उदास विचारें वेच करीं”या तुकोबारायांनी सांगितलेल्या पक्क्या धारणेनं जगतात. म्हणून त्यांची वखवख होत नाही, त्यांना भस्म्या होत नाही. षड्रिपूंचा त्रास तर अजिबात नाही.. हेच तर खऱ्या अर्थानं निरामय आयुष्य आहे ना..!घरात महागडं इंटिरिअर नसलं तरी, घरी कामाला येणाऱ्या बाईंच्या मुलांच्या वह्यापुस्तकांसाठी मात्र बरोबर पैसे दिले जातात, अगदी न चुकता. सकाळी दारी आलेल्या वासुदेवाला किंवा समर्थ संप्रदायातल्या माधुकरी मागणाऱ्यांना तांदळाचं माप मिळतंच. दरवर्षी दिवाळीला पोस्टमनला शंभराची नोट मिळते. सगळ्या रेषा कशा अगदी समांतर.. कशाचंही तंगडं कशातही अडकत नाही, कसला गुंता नाही, वैचारिक गोंधळ नाही. बेष्ट आयुष्य..! समंजस आयुष्य..! विनाशर्त विनातक्रार संपूर्ण स्वीकारलेलं आयुष्य..! ‘क्रेझ’ या गोष्टीशी यांचा लांबून-लांबून संबंध नसतो. म्हणून यांचे व्याप मर्यादित असतात. आयुष्याकडून फार अपेक्षा नसतात, हट्ट-दुराग्रह तर अजिबातच नाहीत. वर्षाकाठी दिवाळीसारख्या एखाद्-दुसऱ्या प्रसंगी कापड खरेदी वगैरे होते, जमल्यास गुरूपुष्यामृताच्या दिवशी एक ग्रॅम सोनं घरी येतं आणि देवघरात देवासमोर ठेवलं जातं. अट्टाहास कुठलाच नाही. ह्या जगण्याला ते ‘हा माझा मार्ग एकला’ असं म्हणू शकतात, पण ‘मैं जिंदगी का साथ निभाता चला गया’ हे म्हणणं त्यांना साधलेलं असतं. ह्या जगण्याला काय म्हणाल? मिडलक्लास? नाही. हा तर खरा वरचा क्लास.. विषमभुज त्रिकोणाला सुद्धा समभुज करण्याची अफाट विलक्षण शक्ती ज्यांच्या दृष्टीकोनात ठासून भरली आहे असा क्लास...! मला फार आनंद आहे की, मी याच क्लासमधला आहे.. मग कुणी त्याला मिडलक्लास म्हणो किंवा मध्यमवर्गीय.. पण हाच आहे खऱ्या शहाण्या माणसांचा क्लास...

**प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे.**
**जे ई एस महाविद्यालय जालना.**
**मोबाईल ~९४२१३१९२७०**

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०४ नोव्हेंबर २०२५

# जाती-आधारित अन्यायाविरुद्ध आवाज बुलंद करण्याची गरज

भारतीय राज्य घटनेने समानतेचे आश्वासने दिले असले तरी अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि इतर मागास वर्ग (ओबीसी) यांना अजूनही जातीवर आधारित हिंसाचार आणि बहिष्काराला सामोरे जावे लागते आहे. सप्टेंबरच्या शेवटी प्रकाशित झालेल्या राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या अहवालानुसार, २०२३ मध्ये अनुसूचित जातींविरुद्ध ५७,७८९ गुन्हे दाखल झाले, जी २०२२ मधील ५७,५८२ प्रकरणांपेक्षा ०.४% ची किरकोळ वाढ दर्शवते. त्याचप्रमाणे, २०२३ मध्ये अनुसूचित जमातींविरुद्ध १२,९६० गुन्हे दाखल झाले, जी २०२२ मधील १०,०६४ प्रकरणांपेक्षा २८.८% ची लक्षणीय वाढ आहे. ग्रामीण भागात जातीय नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल होणारे हल्ले असोत किंवा शहरी भागात घर आणि नोकरीमध्ये होणारा भेदभाव असो, जातीमुळे आजही नागरिकांना प्रतिष्ठा आणि संधी नाकारल्या जात आहे.

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार आणि महात्मा गांधी यांच्यासारखे समाजसुधारक, ज्यांनी ब्राह्मण्यवादी जातीय व्यवस्थेला आव्हान दिले, ते आजही आपल्यासाठी दीपस्तंभ आहेत. त्यांची सामाजिक असमानतेविरुद्धची आंदोलने आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ यांसारख्या संवैधानिक संरक्षणांचा उद्देश हा जातींची उतरंड मोडून काढणे हा होता. समतामुलक समाज निर्माण व्हावा हा उद्देश यामागे होता. या सर्व प्रयत्नानंतरही, समाजाची प्रगती असमान राहिली आहे. जाती-आधारित श्रेष्ठत्वावरील विश्वास अजूनही कायम आहे, ज्यामुळे सामाजिक उच्चभ्रूंना हिंसाचाराची कृत्ये करण्याचे धाडस होते, ज्यामध्ये परंतु त्यांना कोणतीही शिक्षा होत नाही. दलितांना मानवी मूत्र पिण्यास भाग पाडण्यापासून ते आदिवासींना त्यांच्या जमिनीच्या हक्कांसाठी आवाज उठवल्याबद्दल त्यांना बहिष्कृत करण्यापर्यंतच्या हिंसक कृत्यांचा समावेश आहे. अशी कृत्ये केवळ वैयक्तिक पूर्वग्रह दर्शवत नाहीत, तर मानवतावादी मूल्यांना आत्मसात करण्यात समाजाचे अपयश दर्शवतात. यामुळे भारताच्या 'सुसंस्कृत समाज' असल्याच्या दाव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण होते.

भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील वर्तमान राजकीय व्यवस्था या संकटाला तोंड देण्यात कमी पडले आहे. सरकार कधीकधी प्रतीकात्मक उपक्रमाना प्रोत्साहन देते - उदाहरणार्थ, धार्मिक विधींमध्ये दलित आणि आदिवासींचा समावेश करून; पण या प्रयत्नांना ठोस आधार नसतो. हिंदुत्ववादी विचारधारेच्या कथनकांत अनेकदा वंचित/ उपेक्षित समुदायांकडून होणाऱ्या प्रतिकाराला सांस्कृतिक एकात्मतेसाठी धोका म्हणून सांगितला जातो. या कार्यकर्त्यांना अनेकदा "हिंदुफोबिक" (हिंदूविरोधी) असे लेबल लाऊन बदनाम केले जाते. न्यायपूर्ण मागण्यांना दाबण्यासाठी याचा उपयोग केला जातो. अशाप्रकारे सुप्रीम कोर्टाच्या एका निर्णयाच्या विरोधात आंदोलन करणाऱ्यांवर आरोप झाले होते. उदाहरणार्थ, ॲट्रॉसिटीज कायद्यातील तरतुदी सौम्य करणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा निषेध करणाऱ्यांवर केलेली टीका (तिरस्कार) यामध्ये दिसून आली. दलित-बहुजन सांस्कृतिक अभिव्यक्तींवरील निर्बंधांमुळे (हिंदी चित्रपट 'फुले' च्या प्रदर्शनादरम्यान दिसले तसे) ही समुदाये मुख्य प्रवाहाच्या चर्चेचा भाग होण्यापासून अधिक दूर जातात. याव्यतिरिक्त, शिक्षण आणि नोकरीमधील आरक्षणासारख्या सामाजिक न्याय धोरणांची अंमलबजावणी सातत्याने होत नाही. परिणामी, सामाजिक उच्चभ्रू वर्ग हे संस्था आणि सत्ताकेंद्रांवर आपले वर्चस्व गाजवत राहतात.

सामाजिक उच्चभ्रू आणि शोषित/मागास गट यांच्यातील दरी कमी करण्यासाठी एका सशक्त धोरणात्मक चौकटीचा अभाव स्पष्टपणे दिसून येतो. भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या संघटनांनी प्रबळ जातींचे विशेषाधिकार कमी होतील या भीतीमुळे जातीय पूर्वग्रहांना आव्हान देण्यासाठी किंवा आंतर-जातीय बंधुता वाढवण्यासाठी कोणतेही राष्ट्रीय अभियान सुरू केलेले नाही. याऐवजी, ब्राह्मणवादी सांस्कृतिक विमर्षांना प्रोत्साहन दिल्यामुळे दलित आणि आदिवासी समुदायांचे संघर्ष अनेकदा बाजूला ढकलले जातात. त्यांच्या प्रतिकाराला सार्वत्रिक प्रतिष्ठेचा लढा मानण्याऐवजी, पारंपरिक अधिकाराला आव्हान म्हणून चित्रित केले जाते. हिंदुत्ववादी विचारवंतांनी कायम ठेवलेली ही वैचारिक भूमिका समतावादी समाजाच्या घटनात्मक दृष्टिकोनाला कमकुवत करते.

ऐतिहासिकदृष्ट्या, भारताने जातिव्यवस्था बदलून टाकणारी अनेक शक्तिशाली प्रतिकार आंदोलने पाहिली आहेत. १९७० च्या दशकात दलित पँथरने सीमान्त समुदायांना एकत्रित केले, त्यांनी आपल्या राजकीय सामर्थ्याचा आणि सामाजिक प्रतिष्ठेचा हक्क प्रकर्षाने मांडला. उत्तर भारतात बहुजन समाज पक्षाच्या उदयाने दलित आणि इतर मागासवर्गीयांना आणखी सशक्त केले, ज्यामुळे प्रशासन आणि सार्वजनिक चर्चांमध्ये त्यांचा आवाज अधिक वाढला. दलित साहित्य ते आदिवासी कला अशा बौद्धिक आणि सांस्कृतिक उपक्रमांनी भारताच्या बहुलतावादी वारसावर आपला हक्क प्रस्थापित केला. तरीही, आज अशी आंदोलने विखुरलेली आहेत किंवा परिघावर ढकलली गेली आहेत, ज्यामुळे सध्याच्या सामाजिक विकृतींना आव्हान देण्याची त्यांची क्षमता कमी झाली आहे. जातीय अत्याचारांवर नागरी समाजाचा प्रतिसादही कमी झाला आहे.

सध्याच्या घटनात्मक यंत्रणा आणि वैधानिक आदेशांच्या मर्यादा स्पष्टपणे दिसून येतात. कायदे अस्तित्वात असले तरी, तपासातील विलंब, दोष सिद्धीचा निम्नदर आणि न्यायव्यवस्था तसेच पोलीस दलातील सामाजिक पूर्वग्रह यामुळे कायद्यांची अंमलबजावणी बाधित होते. उदा, राष्ट्रीय दलित मानवाधिकार अभियानाद्वारे २०२३ मध्ये केलेल्या एका अभ्यासात असे नोंदवले गेले आहे की, अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत ६०% हून अधिक प्रकरणे आजही न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत. हे आकडे केवळ कायदेशीर तरतुदींच्या पलीकडे जाऊन प्रणालीगत सुधारणांची गरज अधोरेखित करतात.

जातीय अत्याचारांवर मात करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती आणि सामाजिक सुधारणांवर आधारित बहुआयामी दृष्टिकोनाची गरज आहे. प्रथम, कायद्याची अंमलबजावणी मजबूत करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. गुन्हेगारांवर त्वरित खटला चालवणे आणि जातिव्यवस्थेच्या दुष्परिणामांविषयी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांना संवेदनशील करणे आवश्यक आहे. दुसरे, राजकीय नेत्यांनी समतावादी मूल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर अभियान चालवले पाहिजे.

यासाठी शिक्षण, माध्यमे आणि सार्वजनिक मंचांचा वापर करून जातीची उतरंड आणि पूर्वग्रहांवर आधारित पारंपरिक जातीय संबंधांना आव्हान दिले पाहिजे. तिसरे, नागरी समाजाने, ज्यामध्ये धार्मिक संस्था, सांस्कृतिक संस्था आणि शिक्षण क्षेत्राचा समावेश आहे त्या समुदायांमधील दरी कमी करण्यासाठी संवादाला प्रोत्साहन दिले पाहिजे. चौथे, सकारात्मक कृती धोरणे अधिक कठोरपणे लागू केली पाहिजेत आणि शिक्षण, नोकरी व संसाधनांमध्ये समान संधी सुनिश्चित करण्यासाठी पारदर्शकता ठेवली पाहिजे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, दलित, आदिवासी आणि बहुजन आवाज अधिक वाढवले पाहिजेत. जातिव्यवस्थेविरुद्ध संघर्षाच्या वारशाला एका नव्या व्यासपीठाची आणि नेतृत्वाची गरज आहे. जात-विरोधी सामाजिक चळवळींचे पुनरुज्जीवन, वंचित सामाजिक गटांमध्ये एकजूट निर्माण करेल आणि सामाजिक न्यायाच्या अजेंड्याला एक प्रमुख चिंता/मुद्दा म्हणून पुन्हा स्थापित करेल.

**लेखक : हरीश एस. वानखेडे,**
**दलित प्रश्नांचे अभ्यासक, जेएनयू, नवी दिल्ली.**
**अनुवाद : प्रियदर्शन भवरे,**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.**
**स्रोत: द हिंदू । दि. १४ ऑक्टोबर (मंगळवार) २०२५**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002